**ठळक बातम्या**

- केंद्र सरकारनं महाराष्ट्रात रेल्वेसाठी १५ हजार ९४० कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचं स्पष्टीकरण

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू येत्या सोमवारी मुंबईत विधान भवनात आजी माजी आमदारांना संबोधित करणार

- मराठा आरक्षणासाठी पाच दिवसांपासून सुरु असलेलं उपोषण स्थगित करण्याचा मनोज जरांगे यांचा निर्णय

**आणि**

- दक्षिण महाराष्ट्र, कोकण, आणि विदर्भात मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी पूरस्थिती

**<><><><><>**

केंद्र सरकारनं महाराष्ट्रात रेल्वेसाठी विक्रमी १५ हजार ९४० कोटी रुपयांची तरतूद केली असून ही रक्कम विशेष पॅकेजइतकीच आहे, असं प्रतिपादन रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलं आहे. महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांसाठी रेल्वे क्षेत्रात केलेल्या तरतुदींबद्दल ते आज दूरस्थ पद्धतीनं आयोजित वार्ताहर परिषदेत बोलत होते.

महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं सरकार आल्यानंतर रेल्वे प्रकल्पांचं काम वेगानं झालं, असं सांगून, अशा प्रकल्पांसाठी राज्य सरकारची मदत महत्त्वाची असते, असं ते म्हणाले. राज्यात आत्तापर्यंत नवे रेल्वेमार्ग, मार्गाचं दुपदरीकरण, त्रिपदरीकरण इत्यादी कामांसाठी ८ हजार ५८१ रुपयांची, तर गतिशक्ती, मल्टिमोडल टर्मिनल, रेल्वेस्थानकं अशा कामांसाठी १ लाख ३० हजार कोटी

रुपयांची गुंतवणूक केली आहे. तसंच दरवर्षी राज्यात १८० किलोमीटरचे नवे रेल्वेमार्ग तयार होत आहेत, असं त्यांनी सांगितलं.

मुंबई उपनगरीय रेल्वे यंत्रणेची क्षमता वाढवण्याचं काम वेगानं सुरू असून येत्या ५ वर्षांमध्ये जवळपास २५० नव्या रेल्वे धावणार आहेत, अशी घोषणा अश्विनी वैष्णव यांनी केली. उपनगरीय रेल्वे आणि दूरच्या पल्ल्याच्या गाड्यांच्या यंत्रणा वेगवेगळ्या करणं, त्यासाठी वेगवेगळे आराखडे तयार करणं, दोन उपनगरीय रेल्वेमधलं अंतर १८० सेकंदांवरून कमी करून १५० सेकंदांवर आणण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं. रेल्वे सुरक्षेसाठी कवच यंत्रणा लवकरात लवकर देशभरात सुरू करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

येत्या सोमवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू मुंबईत विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात आजी माजी आमदारांना संबोधित करणार आहेत. यावेळी त्यांच्या हस्ते, २०१७-१८ पासून प्रलंबित असलेले उत्कृष्ठ संसदपटू आणि सदस्यांना उत्कृष्ट भाषणासाठीचे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत, अशी माहिती विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते 'वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्व' या पुस्तकाचं प्रकाशन देखील होणार आहे, असं विधान परिषदेच्या उप सभापती नीलम गोऱ्हे यांनी सांगितलं.

<><><><><>

केंद्रीय अर्थसंकल्पात निधी वाटप करताना काही राज्यांसोबत भेदभाव केल्याचा आरोप केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज राज्यसभेत बोलताना फेटाळून लावला. विरोधी पक्षांचं सरकार असणाऱ्या राज्यांना काहीही दिलं नाही असा भ्रम काँग्रेस पसरवत आहे. मात्र, अर्थसंकल्पाच्या भाषणावेळी प्रत्येक राज्याचं

नाव घेतलं नाही म्हणजे त्या राज्यांना काहीच दिलं नाही असं नाही, असं त्या म्हणाल्या. लेखानुदान आणि कालच्या अर्थसंकल्पादरम्यान महाराष्ट्र आणि पश्चिम बंगालमधल्या अनेक विकास प्रकल्पांना मंजुरी दिल्याचं त्यांनी सांगितलं.

केंद्रीय अर्थसंकल्पात निधीचं वाटप करताना विरोधी पक्षांचं सरकार असणाऱ्या राज्यांवर अन्याय झाल्याची टीका काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी राज्यसभेत केली.

लोकसभेतही विरोधी पक्षांनी याच मुद्द्यावरून सभात्याग केला. लोकसभेचं कामकाज सुरू होताच इंडिया आघाडीच्या सदस्यांनी निदर्शने केली.

याच मुद्यावरुन इंडिया आघाडीनं आज संसद भवनाच्या आवारात निदर्शनं केली. सर्व राज्यांना समान न्याय द्यायला हवा अशी मागणी विरोधी पक्षांनी केली.

**<><><><><>**

लोकसभेत आज आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या अर्थसंकल्पावर चर्चा सुरु झाली. चर्चेची सुरुवात करताना काँग्रेसच्या खासदार कुमारी सेल्जा यांनी देशात दिवसेंदिवस वाढत असलेल्या वाढत्या बेरोजगारीचा मुद्दा उपस्थित केला. केंद्र सरकारच्या विविध विभागांमधल्या रिक्त जागा भरण्यासाठी सरकार पावलं का उचलत नाही, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. अग्निवीर योजनेवरूनही त्यांनी सरकारवर टीका केली तर, २०१४ मध्ये भाजपा सत्तेवर आल्यानंतर आर्थिक व्यवस्था पारदर्शक झाल्याचं प्रतिपादन भाजपाचे विप्लव कुमार देव यांनी चर्चेदरम्यान केलं.

अर्थसंकल्पात उत्तर प्रदेशाकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप समाजवादी पार्टीचे वीरेंद्र सिंह यांनी केला. तर, द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाचे दयानिधी मारन यांनी तामिळनाडूकडेही दुर्लक्ष झाल्याचा आरोप केला. पूर नियंत्रणासाठी तामिळनाडूला एक रुपयाही दिलेला नाही असं ते म्हणाले. रोजगार, नोटाबंदी आणि विरोधी नेत्यांविरुद्ध केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर केल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसचे अभिषेक

बॅनर्जी यांनी केला. नीट परीक्षा, रेल्वे अपघात यांवरूनही त्यांनी सरकारवर टीका केली.

**<><><><><>**

जागतिक पातळीवर हळदीला असलेली मागणी लक्षात घेऊन राज्यातल्या शेतकऱ्यांना हळद लागवडीसाठी प्रोत्साहीत करावं असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबई इथं दिले. ते सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या हळद संशोधन केंद्राबाबतच्या आढावा बैठकीत बोलत होते. हिंगोली जिल्ह्यातल्या वसमत इथं आगामी ३ वर्षात सुरु होणार असलेल्या देशातल्या पहिल्या हळद संशोधन केंद्रामुळे मराठवाडा आणि विदर्भासारख्या दुष्काळग्रस्त भागात सुवर्णक्रांती होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. या केंद्रासाठी ८०० कोटी रुपयांचा निधी आजच्या बैठकीत मंजूर करण्यात आला.

**<><><><><>**

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी आपलं उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. जालनाच्या आंतरवाली सराटी इथं गेल्या पाच दिवसांपासून त्यांचं बेमुदत उपोषण सुरू आहे. सरकारचा जीव ज्या खुर्चीत अडकला आहे, ती खुर्ची मिळवण्याच्या तयारीला आम्ही लागणार आहोत, असं जरांगे यांनी वार्ताहरांशी बोलताना म्हणाले.

**<><><><><>**

कुणबी नोंदी न आढळलेल्या मराठा समाजातल्या कुटुंबांसाठी अधिकच्या नोंदी मिळवण्याचा निर्णय सरकारनं घेतला असून हैदराबाद गॅझेटमधल्या नोंदी मिळवण्यासाठी अधिकाऱ्यांचं एक पथक हैदराबादला पाठवल्याची माहिती मराठा आरक्षण मंत्रीउपसमितीचे सदस्य शंभुराज देसाई यांनी दिली.

**<><><><><>**

हवामान खात्यानं आज पालघर, रायगड, पुणे आणि सातारा जिल्ह्याला रेड अलर्ट, तर मुंबईसह ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, नाशिक आणि कोल्हापूर जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. दक्षिण महाराष्ट्र, कोकण, आणि विदर्भात मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात आज दिवसभर धुवांधार पाऊस कोसळत असून, पंचगंगा कोणत्याही क्षणी धोक्याची  पातळी ओलांडेल, असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. राधानगरी धरण ९५ टक्के भरल्यानं स्वयंचलित दरवाजे खुले होण्याची शक्यता आहे. दूधगंगेतून पाणी सोडलं आहे. वारणा धरणातूनही ८ हजार ८७४ घनफूट पाण्याचा विसर्ग सुरू असल्यानं जिल्ह्यातल्या सर्वच नद्यांचं पाणी विस्तीर्ण पसरलं आहे. तब्बल ६३ मार्गांवरची वाहतूक थांबल्यानं निम्मा जिल्हा ठप्प झाला आहे. महापुराचं पाणी रस्त्यावर आल्याने एसटीचे २० मार्ग बंद आहेत. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला असून, पूरबाधित गावातल्या नागरिकांना हलवलं आहे. पावसामुळे नागरिकांना घराबाहेर पडणं कठीण झालं आहे. जिल्ह्यात एका सार्वजनिक मालमत्तेसह १४३ खाजगी मालमत्तांची पडझड झाली आहे.

**सांगली** जिल्ह्यात वारणा आणि कृष्णा नदी पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळे नद्या दुथडी भरून वाहत आहेत. नद्या पात्राबाहेर पडल्यामुळे अनेक पिकांचं नुकसान झालं आहे. महानगरपालिका क्षेत्रातल्या सूर्यवंशी प्लॉटमध्ये नदीचं पाणी आल्यामुळ तिथल्या नागरिकांचं स्थलांतर केलं आहे. सध्या कृष्णा नदी पाणी पातळी वाढ होत असून नदीकडच्या नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**पालघर** जिल्ह्यात आठवडाभरापासून मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे जिल्ह्यातल्या धरणांच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. पालघर जिल्ह्यातलं

सर्वात जास्त पाणी क्षमता असलेल्या सूर्या प्रकल्पाचं धामणी धरण ८० टक्के भरलं असून या धरणातून सध्या सूर्या नदीत पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकांत आज दिवसअखेर ७३ अंकांची घसरण झाली आणि तो ८० हजार ४२९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३० अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ४७९ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीत भारतीय कम्युनिस्ट पक्षाला किमान १५ जागा मिळाव्यात, अशी अपेक्षा पक्षानं व्यक्त केली आहे. भाकपच्या राज्य कौन्सिल सदस्यांचं तीन दिवसीय अधिवेशन नाशिकमधे सुरू आहे. यावेळी राज्य कार्यकारिणीची बैठकीत हा प्रस्ताव मांडण्यात आला. यासंदर्भात महाविकास आघाडीच्या ज्येष्ठ नेत्यांशी संवाद साधून जागावाटपाचा प्रश्न सोडवला जाईल, असं सांगण्यात आलं.

**//<><><><><>//**